


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३५९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०९ ऑगस्ट २०२५

## भाजप, शिंदेसेनेत चढाओढ, ठाकरेसेना रडारवर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** महायुती सरकारमध्ये कुरघोड्यांचं राजकारण सुरु असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली गाठली. गेल्या महिन्याभरात शिंदे तिसऱ्यांदा दिल्लीला गेले. याआधी दोनदा दिल्ली गाठलेली असताना त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांची भेट मिळाली नव्हती. यावेळी मात्र दोन्ही नेते त्यांना भेटले. यावेळी राज्यातील राजकारण आणि महायुती सरकारमधील कुरबुरींवर चर्चा झाली. महायुतीत लक्ष घालण्याची विनंती त्यांनी शहा यांच्याकडे केल्याचं समजतं.



महायुती पुन्हा सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. इच्छा नसताना शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावं लागलं. गेल्या काही महिन्यांमध्ये शिंदे यांचे मंत्री सातत्यानं अडचणीत आले आहेत. त्यांच्यावर आरोप झाले आहेत. काही प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट चौकशीचेही आदेश दिले आहेत. त्यामुळे शिंदेसेनेत अस्वस्थता आहे. फडणवीस सरकारमध्ये शिवसेनेच्या मंत्र्यांना मिळणारी वागणूक चांगली नसल्याची तक्रार शिंदेंकडून भाजप श्रेष्ठींकडे करण्यात आल्याची माहिती आहे. गेल्या काही महिन्यांत घडलेल्या घडामोडी पाहता उद्धव आणि राज ठाकरे यांची युती होण्याची शक्यता वाढली आहे. शिवसेना उबाठा आणि मनसे यांची युती झाल्यास मुंबई आणि आसपासच्या महापालिकांमध्ये दोन्ही पक्षांची ताकद वाढू शकते. बाळासाहेब ठाकरेंचे वारसदार सोबत आल्यास त्याचा फटका शिंदेसेनेला बसेल. त्यामुळे आपलं महत्त्व कायम राखण्यासाठी शिंदेंचे प्रयत्न सुरु आहेत. ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा जोर धरल्यापासून शिंदे यांच्या पक्षात होणारे प्रवेश थांबले आहेत.

लोकसभेत उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे ९ खासदार आहेत. त्यांना गळाला लावण्याची तयारी शिंदेंकडून सुरु आहे. त्या दृष्टीकोनातून शिंदे यांनी त्यांच्या दिल्लीतील दोन्ही भेटींमध्ये चर्चा केल्याचं समजतं. एक-दोन खासदार वगळता ठाकरेंचे बाकीचे शिलेदार गळाला लागल्यास दिल्ली दरबारी आपलं महत्त्व वाढेल. लोकसभेतील खासदारांचा दोन आकडी झाल्यास मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरही दबाव राहील, या दृष्टीनं शिंदे यांच्या हालचाली सुरु आहेत. भाजपदेखील त्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती आहे.

दुसरीकडे भाजपनं ठाकरेंच्या खासदारांशी संवाद वाढवला आहे. २०१९ नंतर ठाकरे आणि भाजपचे संबंध बिघडले. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जहरी टीका झाली. पण गेल्या काही दिवसांपासून भाजपचे केंद्रीय मंत्री ठाकरेंच्या खासदारांशी आस्थेवाईकपणे बोलत आहेत. संसदेच्या लॉबीत, कॉरिडॉरमध्ये भाजपचे मंत्री ठाकरेंच्या खासदारांशी चर्चा करत आहेत. भाजप मंत्र्यांचा अचानक बदललेला सूर पाहून ठाकरेंचे खासदार आश्चर्य व्यक्त करत आहेत.

## पुणे जिल्ह्यात तीन नवीन महापालिका होणार, अजित पवारांनी केली मोठी घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज पहाटे मोठी घोषणा केलीय. यावेळी चाकणला स्वतंत्र महानगरपालिका आणि अन्य दोन महानगपालिका होणार असल्याचं सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. चाकणच्या वाहतूक कोंडीची पाहणी करताना त्यांनी हे मोठं वक्तव्य केलं आहे. त्यासोबतच 'बारामतीची तुलना चाकणसोबत करु नका', असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

**अजित पवार नेमकं काय म्हणाले?**

अजित पवार यांनी आज पहाटे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण चौक आणि परिसराची पाहणी केली. यावेळी ते म्हणाले की, 'पुणे-नाशिक आणि चाकण-शिक्रापूर मार्गावरील या चौकात वाहतूक कोंडी नित्याची असती. याच चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावं लागतं. या एमआयडीसीमध्ये १५०० छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत. त्यात साडेतीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळे या परिसरात लाखोंच्या संख्येत वाहनांची ये-जा असते. या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर असणार आहे. त्यामुळे चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे. काहींना आवडेल न आवडेल, पण हे करावं लागेल', असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. 'तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या



सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे, आणि महानगरपालिका केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी आणि बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत . जसं की रस्ता अंडरग्राउंड ड्रेनेज, अशा अनेक गोष्टी असतात. यामध्ये बँकांचे वर्ल्ड बँकेचे पैसे आणता येतात, केंद्र सरकारचा निधी आणता येतो, या प्रकारे आपल्याला करावे लागेल. काहींना आवडेल न आवडेल. मात्र, काळानुसार निर्णय घ्यावे लागतात. मी देखील काम करताना पाहिलं आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये नव्या महापालिका आल्या, ठाणे महानगरपालिका एकटी होती. त्यानंतर मुंबई महानगरपालिका झाली', असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे.

पुणे जिल्ह्यात नव्यानं तीन महापालिका कराव्या लागणार असल्याचं वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे. 'मांजरी, फुरसुंगी, उरळी देवाची या भागात एक महापालिका, चाकण भागात एक आणि हिंजवडी भागात एक महापालिका करावी लागणार आहे', असंही अजित पवारांनी यावेळी बोलताना म्हटलं आहे.

## रामचंद्र हिंदी प्राथमिक शाळेच्या विकासासाठी शिक्षणमंत्र्यांकडे ५ कोटीची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील जटपुरा गेट परिसरात स्थित रामचंद्र हिंदी प्राथमिक शाळेला मॉडेल स्कुल म्हणून विकसित करण्यासाठी ५ कोटींच्या निधीची मागणी आ. किशोर जोरगेवार यांनी शालेय शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांच्याकडे केली आहे. मंत्री ना. दादाजी भुसे चंद्रपूर दौऱ्यावर असताना, विश्रामगृह येथे आ. जोरगेवार यांनी त्यांची भेट घेऊन त्या संदर्भातील निवेदन सादर केले.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महिला आघाडी अध्यक्षा छबू वैरागडे, भाजप नेते अशोक जिवतोडे, विधानसभा महिला प्रमुख वंदना हातगावकर, प्रकाश देवतळे, युवा मोर्चा अध्यक्ष मयुर हेपट,



नामदेव डाहुले, महामंत्री मनोज पाल, रवि गुरनुले, सविता दंढारे, मंडळ अध्यक्ष प्रदिप किरमे, स्वप्नील डूकरे, सुभाष अदमाने, रवि जोगी, ॲड. सारिका संदूरकर, देवानंद वाढई, वंदना तिखे, सायली येरणे, मंजुश्री कासनगोट्टूवार, प्रज्ञा बोरगमवार यांची उपस्थिती होती.

रामचंद्र हिंदी प्राथमिक शाळा प्रभाग क्र. ७ मध्ये असून ही शाळा गेल्या अनेक वर्षापासून अल्पसाधनांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. शाळेतील बहुतांश विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. सध्या शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून पायाभूत सुविधांचा मोठा अभाव आहे. वर्गखोल्या अपुऱ्या आहेत, शौचालयाची संख्या कमी आहे. तसेच डिजिटल शिक्षणासाठी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. या पार्श्वभूमावर, सदर शाळेला मॉडेल स्कूल दर्जा देत नव्याने सुसज्ज इमारत, स्मार्ट क्लासरुम, संगणक कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय, शौचालय, शुध्द पिण्याचे पाणी, आणि खेळाचे मैदान उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे ५ कोटी निधीची आवश्यकता असून हा निधी मंजीर करण्यात यावा अशी मागणी आ. किशोर जोरगेवार यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना केली आहे.

## घोटीत धावत्या रेल्वेखाली दाम्पत्याने संपवलं जीवन, घटनेनं एकच खळबळ...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, घोटी :** घोटी शहरालगत असलेल्या रेल्वे रूळावर एका दाम्पत्याने आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपविली. बुधवारी (दि. ६) सायंकाळच्या सुमारास ही घटना घडल्याचे वृत्त आहे. दिनेश देविदास सावंत (वय ३८) व भाग्यश्री दिनेश सावंत (वय ३३, रा. सुधानगर, घोटी) असे दाम्पत्याचे नाव आहे. या दाम्पत्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले याचा उलगडा होऊ शकला नाही. मात्र, या घटनेने घोटी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

**काय घडलं?**

बुधवारी सायंकाळच्या सुमारास प्रचीतरायबाबा मंदिर ते घोटी रेल्वे गेटदरम्यान पोल क्र. १४३/३०-३२ या ठिकाणी दिनेश व भाग्यश्री सावंत या दाम्पत्याने नाशिकहून इगतपुरीच्या दिशेने जाणाऱ्या सुपरफास्ट एक्स्प्रेसखाली आत्महत्या केली. या भीषण घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन जागीच ठार झालेल्या या दाम्पत्याचे मृतदेह घोटी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

**अतिशय मनमिळाऊ दाम्पत्य !**

सुधानगर परिसरात राहणारे हे सावंत दाम्पत्य सुशिक्षित होते. शिवाय अतिशय मनमिळाऊ होते. त्यामुळे त्यांच्या आत्महत्येने परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. मृत दिनेश हे महिंद्रा कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी दिनकर सावंत यांचे चिरंजीव होते. त्याचबरोबर दिनेश स्वत:देखील महिंद्राच्या इगतपुरी प्रकल्पात नोकरीस होते.

**मूलबाळ नसल्याने घेतला निर्णय?**

दिनेश यांच्या पश्चात आई-वडील आहेत. दिनेश व भाग्यश्री यांना मूलबाळ नव्हते. रेल्वे कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार घोटी पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.




**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**

## हिरो कंपनीच्या शोरुमची इमारत कोसळली, तिघांचा मृत्यू, तिघे जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**




**दि.०८, गडचिरोली :** आरमोरी येथील हिरो कंपनीच्या शोरुमची इमरत कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली दबून तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. ही घटना शुक्रवारी (८ ऑगस्ट) संध्याकाळी पावणे पाचच्या सुमारास घडल्याची माहिती आहे

आकाश ज्ञानेश्वर बुराडे (वय २५, रा. निलज, ता. ब्रम्हपुरी), तहसीन इस्राईल शेख (वय ३०) व अफसान शेख (वय ३२, दोघेही रा. देसाईगंज) अशी मृतांची नावे आहेत. या दुर्घटनेत सौरभ चौधरी (वय २५, रा. मेंडकी), विलास मने (वय ५०) व दीपक मेश्राम (वय २३, दोघेही रा. आरमोरी) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

काल ७ ऑगस्टला गडचिरोली नजीकच्या काटली येथे ट्रकने धडक दिल्याने चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर आज आरमोरीत इमारत दुर्घटनेत तीन जणांना प्राण गमवावे लागले. या दोन्ही घटनांमुळे जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. सध्या याप्रकरणाचा तपस पोलिस करत आहेत.

## खंडाळा येथे शास्वत शेती दिन साजरा

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.८, खंडाळा (सातारा) :** भारताच्या हरित क्रांतीचे जनक भारतरत्न डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी,मान्यताप्राप्त रामचंद्र धोंडिबा खंडागळे कृषी तंत्र विद्यालय खंडाळा येथे गुरवार दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी शाश्वत शेती दिन उत्सहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सभासद धनंजय शामराव फाटक,विद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाचे प्राचार्य माने सर यांनी याप्रसंगी डॉ. स्वामिनाथन यांचे शेती क्षेत्रातील अमूल्य योगदान, हरित क्रांतीतील भूमिकेची सविस्तर माहिती दिली.७ ऑगस्ट हा दिवस 'शास्वत शेती दिन'म्हणून साजरा करून टिकाऊ आणि वैज्ञानिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे हिच त्यांना खरी आदरांजली ठरेलअसे त्यांनी मार्गदर्शनात सांगितले.विद्यापीठाने शिफारस केलेल्या प्रगत तंत्रज्ञानाविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच यापुढे ७ ऑगस्ट हा दिवस 'शास्वत शेती दिन' म्हणून साजरा केला जाईल असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. धनंजय शामराव फाटक यांच्या हस्ते डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रतिमा पूजनानंतर तयांनी आपले मनोगत व्यक्त करत डॉ.स्वामीनाथन यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन विद्यार्थ्यांनी शास्वत शेतीच्या दिशेने वाटचाल करावीअसे आवाहन केले.

## संपादकीय



### राखी पौर्णिमा...

आज श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण.

या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकम कांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले.

राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो.

एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

# स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत : रक्षाबंधन !



श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धमविलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिंगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा!

**- प्रविण बागडे, नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## पवित्र रक्षाबंधन..

रक्षाबंधनाचे सोहळे
सुस्वागतम् प्रत्युद्गम
निरागस स्नेह साक्ष
मना न किंतू संभ्रम

बहिणा बाई कौतुक
जुळले स्वर ह्रिदम
निरामय अंतःकरण
मनी प्रेमाची सरगम

स्नेहळनितळसरिता
हृदयात होतो उगम
आजकालच्या जगा
नाती टिकवणे दुर्गम


रक्षाबंधन सम सणा
वात्सल्य सुख संगम
निस्पृह प्रेमचं स्थावर
आयुष्य अवघे जंगम

प्राचिन परंपरा उत्तम
आरंभ असे अनागम
हजारो ग्रंथ वाचे जरी
नाते ना कळे अनुगम

निरांजने उजळता ती
कर्तव्याचे हो अवगम
सुखाचे करी स्वागत
दुःखाचे सहज निर्गम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# 'जैत रे जैत'च्या आठवणी..



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मो.८९९९५६६९१७**

आप्पासाहेब गो.नी.दांडेकर यांच्या जैत रे जैत कादंबरीवर आधारित जैत रे जैत चित्रपटाची निर्मिती उषाताई मंगेशकर व पं.हृदयनाथ मंगेशकरांनी केली. ह्या निर्मितिला पन्नास वर्षे होत आहेत. त्या निमित्ताने पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चित्रपटातील

आठवणी जागवल्या गेल्यात. पं.हृदयनाथ, डॉ. मोहन आगाशे, सतिश आळेकर, रविंद्र साठे, मृणाल कुळकर्णी, आदिंचा सहभाग होता. ह्या सगळ्यांनी त्या वेळेच्या आठवणी सांगीतल्या. रविंद्र साठे, विभावरी आपटे, मनिषा निश्चल, यांनी चित्रपटातील लोकप्रिय गाणी ऐकवली. ना.धो.महानोरांची सोळा गाणी यात आहेत. आणि पं.हृदयनाथ यांचे संगीत. गाणे आणि संगिताबरोबरीने पुढे पुढे जाणारा चित्रपट सुरुवातीला प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला नाही. पण नंतरच्या काळात, अनेक पारितोषिके मिळाली. गाणेही अतिशय लोकप्रिय झालीत.

ग्रामीण भागात कलाकार एकरुप झाले, त्यामुळेच त्यात जिवंतपणा आला. आज ईतक्या वर्षानंतर ही चित्रपट आठवणीत रहातो. पण आता याच्यापुढे असा चित्रपट आल्यास त्याला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळेल का? याविषयी त्यांनी साशंकता व्यक्त केली.

कार्यक्रमात जैत रे जैत चित्रपटाविषयी संपूर्ण माहिती असललेले एक घोट मृगजळाचा ह्या पुस्तका विषयावर स्वतः लेखिका विजयालक्ष्मी मणेरीकर( नाशिक) बोलल्यात. हे पुस्तक म्हणजे चित्रपटाविषयी, कथा, गाणी, संगीत, कलाकारां विषयावर सविस्तर लिहिले आहे. थोडक्यात पुस्तकातून चित्रपट डोळ्यासमोर उभा रहातो.

# रमीबाज मंत्री माणिकराव कोकाटे यांना बरखास्त करा 'उबाठा'ची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, लोणार (बुलडाणा) :** शेतकऱ्यांच्या समस्यांना तिलांजली देणारे रमीबाज मंत्री माणिकराव कोकाटे यांना बरखास्त करा. अशी मागणी शिवसेना उ.बा.ठा. जिल्हा संघटक डॉ.गोपाल बच्छिरे यांनी तहसीलदार मार्फत राज्यपाल यांना केली.

निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू, विजबिल माफ करू, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे दिवास्वप्न दाखवून शेतकऱ्यांना दिलेले अभिवचन शेवटी जुमला ठरविले. शेतकरी आज मेटाकुटीला आला आहे. कुठे गारपीट, कुठे अतिवृष्टी, कुठे ढगफुटी यामुळे शेतकरी बरबाद झाला आहे व तो आत्महत्या करत आहे.

निवडून दिलेले मंत्री माणिकराव कोकाटे हे शेतकऱ्यांच्या प्रश्नाला तीलांजली देऊन संसदेत काम काज सुरू असताना मोबाईलवर पत्याचा जुगार, रमी खेळतात. अश्या शेतकऱ्यांविषयी असंवेदनशील कृषिमंत्री




माणिकराव कोकाटे यांना आता क्रीडा मंत्री केले. हे तर एक मंत्रीपद काढून दुसरे मंत्रीपद देणे मी शिक्षा आहे का बहुमान, म्हणून मंत्री माणिकराव कोकाटे यांना त्यांच्या मंत्री पदावरून बरखास्त करा नसता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महामहिम राज्यपाल यांना तहसीलदार लोणार यांच्यामार्फत देण्यात आला. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ गोपाल बछिरे यांच्या सह शहर प्रमुख गजानन जाधव सर, तालुका संघटक विजय मोरे महिला संघटिका तारामती जायभाये, शालिनीताई मोरे, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे सर, प्रकाशभाऊ सानप, उपसरपंच रवींद्र सुटे, युवा शहर अधिकारी श्रीकांत मादनकर, विभाग प्रमुख गोपाल मापारी, तानाजी अंभोरे, अमोल सुटे, विजय घोडके, मंगेश मोरे, ज्ञानेश्वर दूधमोगरे, अल्पसंख्यांक चे अशपाक खान, फहीम खान, उमेश मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मानपाडा पोलीस ठाण्यात शिवसेना महिला आघाडीच्यावतीने रक्षाबंधन साजरे



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त शिवसेना महिला आघाडीच्या ऋषी समिती प्रमुख मीना योगेश गवारी यांच्या नेतृत्वाखाली मानपाडा पोलीस ठाण्यात रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी महिला आघाडीच्या सदस्यांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना राखी बांधून त्यांचे स्वागत केले व त्यांच्या समाजासाठी असलेल्या अविरत सेवेबद्दल आभार व्यक्त केला. उपस्थित असलेले महिला आघाडीचे महिलांनी सांगितले की, देशाच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या जवानांप्रमाणेच आपले पोलीस बलदेखील समाजाच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असते. त्यांना राखी बांधणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांनीही महिला आघाडीच्या या उपक्रमाचे कौतुक केले व सांगितले की, अशा सामाजिक उपक्रमांमुळे पोलीस आणि नागरिक यांच्यात विश्वास आणि स्नेहाचे बंध अधिक दृढ होतात. या कार्यक्रमात महिला आघाडीच्या अनेक सदस्यांनी सहभाग घेतला आणि रक्षाबंधनाचा उत्सव आनंदात साजरा केला.

# वंदे भारत एक्सप्रेस आता अहिल्यानगरच्या स्थानकावर

## खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आणि विशेषतः अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील प्रवाशांच्या सोयीसाठी आता नागपूर ते पुणे हे वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सेवा सुरू करण्यास रेल्वे मंत्रालयाने हिरवा झेंडा दाखविला आहे. या गाडीला अहिल्यानगर येथे अधिकृत थांबा देण्यात आला असून जिल्ह्यातील प्रवाशांना आता जलद, आरामदायक आणि उच्च दर्जाच्या प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

पुणे येथे दिनांक २३ जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार मंडळाच्या बैठकीत अहिल्यानगर स्थानकावर विविध गाड्यांना थांबा देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली होती. त्याची दखल घेऊन वंदे भारत एक्सप्रेसला थांबा देण्यात आला आहे.



**सकारात्मक बदल होईल**

वंदे भारत सारखी उच्च दर्जाची सेवा जिल्ह्याला मिळणे ही ऐतिहासिक बाब आहे. रोजगार, शिक्षण, व्यापार,आरोग्य आणि संपर्क यामध्ये मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल होईल. नागपूर आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांशी जिल्ह्याचा थेट संपर्क सुलभ होईल.

**– खासदार निलेश लंके**

दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी नागपूरहून या रेल्वेसेवेला सुरूवात होणार असून अजनी, नागपूर येथून सोमवार वगळता आठवडयातून ६ दिवस ही गाडी पुण्याकडे प्रस्थान करणार आहे. तर पुण्याहून मंगळवार वगळता आठवडयातून ६ दिवस ही गाडी अजनी, नागपूरकडे प्रस्थान करणार आहे. अजनी, नागपूरहून पुण्याकडे जाताना या गाडीचे अहिल्यानगर स्थानकावर सायंकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी आगमन होईल व ७ वाजून ३७ मिनिटांनी पुण्याकडे प्रस्थान होईल.

पुण्याहून अजनीकडे प्रस्थान करताना अहिल्यानगर स्थानकावर ही गाडी सकाळी ८ वाजून ३३ मिनिटांनी पोहचेल व ८ वाजून ३५ मिनिटांनी अजनी, नागपूरकडे प्रस्थान करेल. अजनी, नागपूर स्थानकावरून ही एक्सप्रेस सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी सुटेल तर पुण्याहून सकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी नागपूरसाठी सुटणार आहे.

## विंचूर येथे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात साजरा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** विश्वाला वस्त्रे निर्माण करणारे श्री भगवान जिव्हेश्वर महाराजांची जयंती सोहळा दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी विंचूर येथील भवानी पेठेत साजरा करण्यात आला. भगवान जिव्हेश्वर महाराज समस्त स्वकुळ साळी समाजाचे आद्य पुरुष, आदिमाया आहे. शिव शंकराच्या जिव्हेतून जिव्हेश्वरांचा जन्म झाला आहे. विश्वातील मानवाला अंग झाकण्याकरिता भगवान शंकर आणि पार्वतीच्या आज्ञाने श्री जिव्हेश्वरांनी हातमागद्वारे वस्त्र निर्मित केले. त्यांनी संपूर्ण सृष्टीला वस्त्र पुरवण्यासाठी वस्त्रउद्योग सुरू करून साळी जातील हा उद्योग निर्माण करणारे श्री जिव्हेश्वर महाराज आहेत. त्यांच्या जयंती निमित्त आज विंचूर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आदल्या दिवशी रात्री ९ वाजता कलश पूजन करण्यात आले. पहाटे ६ वाजता भजनी मंडळांच्या उपस्थित काकड आरती करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता विंचूर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये सर्व पुरुष व महिलांची उपस्थिती होती. महिलांनी फुगडी खेळत व लहान मुलींनी कलश डोक्यावर धरत मिरवणुकीची शोभा वाढवली. शोभायात्रा संपन्न झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या प्रमाणात भावी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी स्वकुळ साळी समाज बांधव मोठ्या संख्येने हजर होते.

# गाजदीपूर रस्त्याच्या कामासाठी शिवाजी रोकडे यांचा उपोषणाचा इशारा

## पारनेर तहसीलदार गायत्री सौदाणे यांना निवेदन



स्वातंत्र्य काळापासून आदिवासी दुर्गम भागातील गाजदीपूर रस्त्याचा प्रश्न प्रलंबित आहे हा प्रश्न मार्गी लावावा अशी स्थानिक ग्रामस्थांचे अनेक दिवसापासूनची मागणी आहे. परंतु प्रश्न मार्गी लागत नाही. या भागात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर राहतो या विषयावर मी उपोषणाला बसत आहे.

**– शिवाजी रोकडे (चेअरमन, सोसायटी वडगाव सावताळ)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** वडगाव सावताळ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गाजदीपूर आदिवासी वस्तीवरील रस्त्याची समस्या स्वातंत्र्य काळापासून प्रलंबित आहे. येथील सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांनी पारनेर तहसीलदार यांना निवेदन देऊन या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. यावेळी जेष्ठ नेते ज्ञानदेव (माऊली) शिंदे उपस्थित होते. गाजदीपूर ही २ हजार हून अधिक लोकसंख्या असलेली वस्ती असून, वडगाव सावताळपासून ६ किमी अंतरावर आहे. रस्त्याचा काही भाग वनविभागाच्या हद्दीतून जात असल्याने पक्का रस्ता बांधण्यात अडचणी येत आहेत. यामुळे रहिवाशांना आरोग्य, शिक्षण आणि दळणवळणाच्या सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही. या समस्येमुळे त्रस्त झालेल्या रहिवाशांनी आता कठोर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरू न झाल्यास १३ ऑगस्ट २०२५ पासून पारनेर तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा इशारा शिवाजी रोकडे यांनी दिला आहे. त्यांनी निवेदनात निधी उपलब्ध करून रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी केली आहे. ही परिस्थिती गंभीर असून आदिवासी बांधवांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत आहे. जिल्हा प्रशासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कचराळी तलाव परिसरात मनसेच्या पाठपुराव्याला यश



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०८, ठाणे :** कचराळी तलाव सांडपाणी व कचरा जमा असलेली बोट हटवली,फवारणी व निर्जंतुकीकरणाची कार्यवाही पूर्ण. परिसरातील अस्वच्छ लोखंडी बोटमुळे डेंग्यू-मलेरियाचा धोका वाढल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ठाणे महापालिकेकडे ठोस तक्रार करण्यात आली होती. दोन दिवसांत तात्काळ पाठपुरावा करत अखेर आज मनसेच्या आंदोलनाचा ठोस परिणाम दिसून आला. संबंधित बोट हटवण्यात आली असून आरोग्य विभागाकडून परिसरात फवारणी व निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे. या कामगिरीमुळे तलाव परिसरात फिरायला येणारे ज्येष्ठ नागरिक व महिला यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आभार मानले. या यशस्वी पाठपुराव्यासाठी मनसे ठाणे शहर विधानसभा सचिव संजय भुजबळ यांचे विशेष योगदान असून यांनी ही बाब गांभीर्याने घेत बातमीला योग्य प्रसिद्धी दिली, याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

## पनवेल मनपा व महात्मा इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने वृक्षारोपण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, पनवेल :** 'सुंदर पनवेल, हरित पनवेल' या संकल्पनेखाली पनवेल महानगरपालिकेच्या उद्यानविभागार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे. प्रभाग समिती क कामोठे मार्फत बुधवारी महात्मा इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ०८, खांदा कॉलनी येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. आवळा, जांभूळ, यासारखी फळझाडे व बेहडा, बहावा, अशोक अशा ५० वृक्षांची लागवड करण्यात आली.

# औद्योगिक अतिक्रमणामुळे ठाण्यातील कोळी बांधवांचा मासेमारी व्यवसाय अडचणीत

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील पारंपरिक मासेमारी करणाऱ्या कोळी समाजाच्या उपजीविकेला विकासाच्या नावाखाली मोठा धक्का बसत आहे. खाडी व खाजण क्षेत्रामध्ये झपाट्याने चाललेल्या शहरविकास, बंदर प्रकल्प, खाडी भराव आणि औद्योगिक अतिक्रमणामुळे मासेमारीसाठी आवश्यक असलेले नैसर्गिक पर्यावरण दिवसेंदिवस नष्ट होत चालले आहे. त्यामुळे शतकानुशतक चालत आलेला कोळी समाजाचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला असून, रोजगाराचा मुख्य आधार हिरावला जात आहे.

या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय कोळी समाज (नोंदणीकृत), दिल्लीच्या ठाणे जिल्हा शाखेतर्फे जिल्हाधिकारी यांना आज निवेदन देण्यात आले. राष्ट्रीय मत्स्यपालन धोरण २०२० चा संदर्भ देत, पारंपरिक मासेमारीस पूरक वातावरण निर्माण करण्याच्या मागण्या या निवेदनात मांडण्यात आल्या.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, खाडी किनाऱ्यावर वास्तव्यास असलेल्या कोळी समाजाचे जीवनचक्र पूर्णतः मासेमारीवर आधारित आहे. मात्र सध्या विकासाच्या नावाखाली चाललेल्या प्रकल्पांमुळे त्यांचे नैसर्गिक जलस्रोत, जाळी टाकण्याच्या जागा, मासे प्रजनन क्षेत्रे आणि विक्रीसाठी लागणाऱ्या सुविधा या सगळ्याच गोष्टी बुडीत चालल्या आहेत.

परिणामी शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, मासेमार समाजात अदृश्य बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

**कोळी समाजाच्या वतीने पुढील ५ प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत -**

१. गाव उपगाव खाडी घोषित करून मासेमारीसाठी अधिकृत परवाने द्यावेत.

२. मासेमारीसाठी लागणारी



परंपरागत साधने (होडी, खवला, जाळी) यांना कायदेशीर मान्यता द्यावी.

३. नैसर्गिक जलाशयांमध्ये मत्स्यपालनाच्या योजना लागू कराव्यात.

४. मासे विक्रीसाठी कायमस्वरूपी मच्छी बाजारांची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

५. मासेमारी करणाऱ्या समाजासाठी विशेष निधी व विकास योजना कार्यान्वित कराव्यात.

दरम्यान या निवेदनावर ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद कोळी यांच्या स्वाक्षरीसह मागण्या सादर केल्या गेल्या असून, शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन पारंपरिक मासेमारीस पुनरुज्जीवित करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

कोळी समाजाच्या पारंपरिक ज्ञानावर आधारित ही अर्थव्यवस्था केवळ स्थानिकांचाच नव्हे, तर संपूर्ण जैवविविधतेचा भाग आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरणाचा समतोल राखत मासेमारी व्यवसायाचे जतन करणे हे प्रशासनाचे नैतिक कर्तव्य आहे, असे या निवेदनातून अधोरेखित करण्यात आले आहे.

# आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच केंद्रबिंदू : शिक्षणमंत्री भुसे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** विद्यार्थी हे आपले दैवत आहे. त्यांना चांगले शिक्षण देणे व त्यांच्यातील कलागुणांना विकसित करणे, हे प्रत्येक शिक्षकाचे ध्येय असावे. आज कृत्रिम तंत्रज्ञान व ई- माध्यमे यांच्या युगातही विद्यार्थ्यांची जमिनीशी नाळ तुटणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अभ्यासक्रम यासोबतच खेळ, कला आदी बाबींना प्राधान्य द्यावे. आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

जिल्हा परिषद येथे आयोजित शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंचावर आ. किशोर जोरगेवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य




कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नूतन सावंत, विभागीय शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी (प्राथ.) अश्विनी सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्य.) राजेश पातळे, मुख्य लेखाधिकारी अतुल गायकवाड, विनीत मत्ते आदी उपस्थित होते.चंद्रपूर येथील शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत अनेक चांगल्या मुद्यांचे सादरीकरण झाले, असे सांगून शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, आयडॉल शिक्षकांच्या उपक्रमांचा इतरांनीही आदर्श घ्यावा. त्यांनी केलेले काम केवळ त्यांच्या शाळेपुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण केंद्रातील शाळांनी त्याचे अनुकरण करावे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ग्रामस्तरावरील शाळांना भेटी द्याव्यात. त्यामुळे स्थानिक स्तरावर छोट्या छोट्या अडीअडचणींची माहिती होते व हे प्रश्न सहजासहजी सुटण्यास मदत होते. शाळांच्या भौतिक सुविधांना शासनाने प्राधान्य दिले आहे. यात शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छता, स्वच्छ शौचालय, इमारतींची देखभाल दुरुस्ती, ई- सुविधा, वाचनालय, क्रीडांगण लॅब या बाबींचा समावेश आहे. शाळांना अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येत्या १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीपर कवायत उपक्रम राज्यस्तरावर राबविण्यात येणार आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. शाळेच्या भौतिक सुविधेसोबतच गुणवत्तापूर्ण शिक्षणाने शाळांचा कायापालट करणाऱ्या आयडॉल शिक्षकांनी शिक्षण मंत्र्यांसमोर आपापल्या शाळांचे सादरीकरण केले. यात शिक्षक दीपक गोतावळे, अविनाश जुमडे, गिरीधर पानघाटे, मोहिनी देशमुख, सविता झाडे, अजय मुसळे, अली अजाणी, शिल्पा ठाकरे, सोनाली चारवळ या शिक्षकांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे आणि राजेश पातळे यांनी केले. संचालन विवेक इत्तडवार यांनी तर आभार उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख यांनी मानले.

# थोडक्यात

## गरजू होतकरू विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यसंगी व बहुआयामी होते - सरन्यायाधीश गवई

## मराठी भाषा कृतीपुस्तिका निर्मितीसाठी नागपूर जिल्ह्यातील ९ शिक्षकरत्नांची निवड

## टाकळीढोकेश्वर ग्राम दक्षता समितीच्या अध्यक्षपदी नारायण झावरे

## थकीत देयकांच्या मागणीसाठी धाराशिव कंत्राटदार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## कलाशिक्षक संतोष क्षिरसागर यांनी रेखाटले मातीच्या विटेवर पांडुरंग

## आषाढी एकादशीला खापरखेडा-भानेगाव परिसरात अवतरली पंढरी

## विकास कामे खऱ्या अर्थाने जनतेने करून घेतली पाहिजे - महसूल मंत्री बावनकुळे

## कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड विरोधात बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

## ज्येष्ठ नागरिकांच्या सुखकर प्रवासासाठी मुंबई लोकलला लागणार स्वतंत्र डबा

## थोडक्यात

### जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे येथे आषाढी वारीचा कार्यक्रम

### राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल खंडुखैरेवाडी येथे पालखी सोहळा संपन्न

### आषाढी एकादशीनिमित्त लिटल चॅम्प स्कूल ची दिंडी

## बल्लारपूर येथील घरफोडी प्रकरणी २ आरोपींना मुद्देमालासह अटक